# ठाणे महानगरपालिका ठाणे

## क्रिडा विभाग

## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने क्रकेट खेळाचे खेळाडु दत्तक घेऊन पुरुष व्यावसायिक क्रिकेट संघाकरिता **प्रशिक्षक** यांच्या कडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या मा महासभा ठरावानुसार क्रिडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने क्रिकेट या खेळाचे व्यावसायिक संघ तयार करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका शहरातील उद्योन्मुख क्रिडापटुंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्याच्या हेतुन ठाणे महानगरपालिकेच्या वतीने पुरुष क्रिकेट व्यावसायिक संघाकरिता प्रशिक्षक या पदाकरिता ११ महिन्यांच्या नेमणुकीसाठी कंत्राटी पध्दतीने खालील अटी व शर्तीस अधिन राहुन अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्जदाराने खालील पात्रतेच्या अटींची पुर्तता केरणे आवश्यक आहे.

- प्रशिक्षकांकरिता अटी :-

१) मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) च्या प्रशिक्षक पदाची लेवल १ ची परिक्षा पास झालेला असल्या बाबतचा दाखला

२) मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) आयोजीत अ गटातील सामने खेळले असल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) संलग्न असलेल्या संघाचा प्रशिक्षक असल्याचा ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**प्रशिक्षकाची कर्तव्ये व महत्वाच्या सुचना**

१) सदर संघातील प्रशिक्षकाला प्रतिमहा रक्कम रु. ३०,०००/- या प्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.

२) प्रशिक्षकाची नियुक्ती शासनाने सुचित केल्याप्रमाणे विहित नियमानुसार ११ महिन्याकरिता कंत्राटी/करार पध्दतीने असेल. त्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

३) प्रशिक्षकाला वेळोवेळी सरावास उपस्थित राहणे बंधनकारक राहिल. खेळाडुंकडुन उत्तम सराव करुन घ्यावा लागेल.

४) खेळाडुस सरावा दरम्यान अथवा स्पर्धे दरम्यान दुखापत झाल्यास प्रशिक्षक खेळाडु सोबत उपचारा दरम्यान उपस्थित राहील.

५) जर खेळाडुंकडुन प्रशिक्षकाबद्दल कोणतीही तक्रार आल्यास तक्रारीची शहानिशा करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

६) ठाणे महानगरपालिकेच्या क्रिकेट संघाकरिता निवड झालेले सर्व खेळाडु व ठाणे महापालिकेचे स्थायी पदावरील क्रिकेट खेळाडु दैनंदिन सरावाकरिता उपलब्ध राहण्याचे जबाबदारी संघ प्रशिक्षकाची राहिल.

७) इतर क्रिकेट स्पर्धांना उपस्थित राहण्याकरिता संघ प्रशिक्षकाने आगाऊ लेखी मान्यता घेणे आवश्यक आहे.

८) सदर प्रशिक्षकाला ठाणे महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेले गणवेश (शुज, टि शर्ट, पॅन्ट किट बॅग, ट्रॅकसुट) व क्रिडा सहित्य (बॅट,बॉल, स्टंप इ.) ठाणे महानगरपालिकेचा संघ ज्या स्पर्धांना खेळत असेल तेथेच वापरणे बंधनकारक राहील. इतर स्पर्धांना ठाणे महानगरपालिकेचा गणवेश अथवा क्रिडा साहित्य वापरल्यास प्रशिक्षकावर कारवाई करण्यात येईल.

९) सदर प्रकरणी कोणताही वाद उद्धवल्यास मा आयुक्त सो यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या प्रशिक्षक यांनी २९/१०/२०२६, सायं, ०५.०० वाजेपर्यंत आपल्या नमुद प्राविण्य प्रमाणपत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतींसह, क्रिडा अधिकारी, दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह , जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड, ठाणे (प) या पत्यावर अर्ज सादर करावेत. अर्ज करताना लिफाफ्यावर अर्जदार यांनी **ठाणे महानगरपालिका पुरुष क्रिकेट संघाकरिता प्रशिक्षक पदाकरिता नियुक्तीसाठी अर्ज केलेला आहे.** असे मोठ्या व ठळक अक्षरात नमुद करावे.

अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता खलीलप्रमाणे आहे.:
प्र.उप आयुक्त (क्रिडा):
दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह
जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड,
ठाणे (प.)

ठामपा/पिआरओ/क्रिडा/ ४६०/२०२६-२७
दि. २७ /१० /२०२६

(मिनल पालांडे)
प्र.उप आयुक्त (क्रिडा)
ठाणे महानगरपालिका ठाणे

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

## क्रिडा विभाग
## अर्जाचा नमुना
## (पुरुष क्रिकेट संघाकरीता प्रशिक्षक पदासाठी अर्जाचा नमुना)

प्रति,
मा. आयुक्त साो,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

फोटो

१. संपूर्ण नाव :- ....................................................................
(प्रथम आडनाव)
२. संपूर्ण पत्ता :- ....................................................................
....................................................................
....................................................................
....................................................................
३. संपर्क क्रं. :- ............................Email ID .........................

४. जन्म तारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

५. आज रोजीचे वय :-

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

६. शैक्षणिक अर्हता :-

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

६(अ). इतर अर्हता-

...................................................

...................................................

...................................................

...................................................

७.नोकरी करीत असल्यास :-

| संस्थेचे नांव व पत्ता | कार्यरत असलेल्या पदाचे नांव | कालावधीत | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) च्या प्रशिक्षक पदाची लेवल 1 ची परिक्षा पास झाल्याचा दाखला

मुंबई क्रिकेट असोसिएशन (MCA) आयोजीत अ गटातील सामने खेळाले असल्याचा अनुभव असण आवश्यक आहे.

मुबई क्रिकेट असोसिएशन (MCA) संलग्न असलेल्या संघाचा प्रशिक्षक असल्याचा ५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

| स्पर्धा | संघ | दिनांक | स्थळ | आयोजक | स्थान/ क्रमवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९. अवगत असणाऱ्या भाषा :

| भाषा | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| | | | |

१०. आपणास विरूध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्मभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे / नाही? असल्यास थोडक्यात तपशील द्यावा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

११. अर्जासोबत खालील (छायाकिंत) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

१.
२.
३.
४.
५.

वर दिलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे व माझ्या समजुतीप्रमाणे पुर्णत: सत्य आहे. कोणतीही माहिती असत्य व अपुर्ण किंवा चुकीची असल्याचे आढळुन आल्यास किंवा निवडीच्या पुर्वी किंवा नंतर काही अपात्रता आढळुन आल्यास माझी उमेदवारी/नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र असेन व माझी कोणत्याही टप्यावर नेमणुक रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक :

( )
उमेदवाराचे नाव व सही